# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
## महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

फोन : ०२४५२-२३३३७५, ०२४५२-२२८१७६ फॅक्स : ०२४५२-२२६१८८ इ-मेल : vetcp@rediffmail.com

प्रा.डॉ.सतिश दिग्रसकर
सहयोगी अधिष्ठाता

जा.क्र.पवैम/गोशाळा/५१६१/१८
दि. १ मार्च २०१८

सन्माननिय गोशाळा संचालक,

सस्नेह नमस्कार

राज्यात गोसंवर्धन, देशी गोवंश विकास, गो-आधारीत शेती यासह गोउत्पादनांबाबत जागरूकता वाढत असून सेंद्रिय शेती उत्पादनाची गतीमानता उत्साहवर्धक आहे. 'गाय' उपयुक्ततेच्या दृष्टीने शोध, संशोधन, विचार, मंथन आणि आभ्यास याद्वारे पडताळली जात असून विज्ञानातून गायीचे स्वरूप उलगण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू आहेत. गोउत्पादने आणि पंचगव्य याबाबत दिसून येणारा सकारात्मक पुढाकार वैज्ञानीक दृष्टया सिध्द होईल असे प्रयत्न स्पृहणीय आहेत.

आपण आणि आपल्या सहकाऱ्यांनी मनोभावे गोशाळा निर्मिती, गोशाळा व्यवस्थापन, गोसांभाळ, गोवंश जतन अशा अनेक प्रकारे आपला अमुल्य सहभाग गोसंवर्धनासाठी निस्पृहपणे, निरंतरपणे आणि स्वयंप्रेरणेने घेतला असून गोशाळा अधीक चांगल्या प्रकारे साकारली जावी यासाठी प्रयत्नशील आहात, ही खरोखर अभिनंदनीय बाब आहे. राज्यातील सर्व नोंदणीकृत गोशाळा सक्षम असाव्यात, स्वयंपूर्ण व्हाव्यात, विज्ञानावर आधारीत गोपालनाचे केंद्र बनाव्यात आणि गोवंश जतनाचे कार्य शास्त्रीय पध्दतीने राबविणाऱ्या जाणाऱ्या संस्था ठराव्यात यादृष्टीने प्रगती करणे सर्वांना आपेक्षीत आहे.

राज्यात गोवंश जतन, संवर्धनाची जबाबदारी राज्य शासनाचा पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची असल्याने नोंदणीकृत गोशाळा सक्षमीकरणासाठी अधीक दर्जेदार प्रभावी कार्य आणि तांत्रीक सहयोग गोशाळांना देण्यासाठी परीपूर्ण माहिती संचय एकत्रीत स्वरूपात संकलीत असण्याची गरज आहे. केवळ उपलब्ध माहितीच्या आधारेच गोशाळांना अपेक्षीत असणारे तांत्रीक आणि शास्त्रीय सहकार्य प्रदान करता येणे शक्य होवू शकेल.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे नूतन कुलगुरू मा. प्रा. डॉ. आशीष पातूरकर यांच्या संकल्पनेत राज्यातील गोशाळांच्या तांत्रीक सक्षमीकरणाची यंत्रणा विद्यापीठातील अनुभवी व तज्ज्ञ पशुवैद्यकांकडून सुलभ पध्दतीत कार्यान्वीत करण्याचे निश्चीत करण्यात आले आहे. या सहकार्यातून गोशाळांना शास्त्र व तंत्र उपलब्धीतून गोवंश सुधारणा प्रभावीपणे घडविता येवू शकेल तर विद्यापीठाचे प्रशिक्षणार्थी पशुवैद्यक व संशोधक आपल्या गोशाळेतील गोसंपदा उत्पादन, आहार, प्रजनन यादृष्टीने आभ्यास करून सुयोग्य शिफारशी प्रदान करू शकतील. स्पष्ट उद्देश असा की, गोशाळांना बिनखर्चीक सहयोगातून सक्षमीकरणाची जोड देत गोसंवर्धन कार्य अधीक चांगल्याप्रकारे राबविता येईल.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठास राज्यातील गोशाळा सक्षमीकरणासाठी तांत्रीक सहकार्याचा हात आपणाकडून जरूर स्वागतार्थ ठरेल, अशी अपेक्षा आहे. यासाठी आपणास विनंती की, आपल्या गोशाळेबाबतची सविस्तर माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रकाच्या मुद्यांना अनुसरून अपेक्षीत आहे. महाविद्यालयातील प्रा. डॉ. नितीन मार्कंडेय, डॉ. बा.वा. नरळदकर आणि डॉ. अ.पा.पाटील यांचा चमू गोशाळा बाबतीत माहिती संकलन, पृथःकरण आणि निष्कर्षाचे काम करणार आहे. आपण आपल्या गोशाळेची माहिती पत्राद्वारे खालील पत्यावर अथवा ई-मेलद्वारे तसेच प्रत्यक्ष प्रतिनिधीद्वारे सादर करू शकता.

राज्यात गोशाळांबाबत विकासाचा विचार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाकडून प्रथमच राबविला जात असून आपणास कळविण्यास मला आनंद होतो की, विद्यापीठाकडील उपलब्ध मनुष्यबळाकडून राज्यातील गोशाळांना पशुविज्ञान आणि गोउपचार सेवा प्रदान करण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करण्याचा मा. कुलगुरूंचा मनोदय असून आपल्याकडून माहिती संकलन झाल्यानंतर आपल्या संचालक मंडळास पाचारण करून 'गोशाळा सक्षमीकरणात विद्यापीठाची भुमिका' अधोरेखीत करण्यासाठी प्रत्यक्ष चर्चा, समन्वय कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. आपल्या प्रतीसादाची अपेक्षा.

गोशाळा सक्षमीकरणाच्या कार्यासाठी आपले सहकार्य विद्यापीठाच्या विधायक कार्यासाठी लाभेल अशी अपेक्षा. आपला माहिती प्रतीसाद १५ एप्रिल २०१८ पर्यंत मिळावा.

धन्यवाद ! सहकार्याची अपेक्षेत.

आपला स्नेहांकीत

**डॉ. स. उ. दिग्रसकर**
अधिष्ठाता

नोट : १. गोशाळा माहिती संकलनाबाबत अधिक माहितीसाठी डॉ. नितीन मार्कंडेय यांना ८२३७६८२१४१/९४२२६५७२५१ या भ्रमणध्वनी क्रंमाकावर, डॉ. बा.वा.नरळदकर यांना ९४०३८४७७६४ भ्रमणध्वनी क्रंमाकावर तर डॉ. अमोल पाटील यांना ९०११२३२८०५ भ्रमणध्वनी क्रंमाकावर संपर्क साधावा. २. आपल्या गोशाळेची माहिती ई-मेल swanitee@rediffmail.com, babanar47@gmail किंवा extnparbhani@gmail.com वर पाठवावी. ३. 'गोशाळा माहिती' या शिर्षकाखाली महाविद्यालयाच्या पत्यावर सुध्दा माहिती पत्राद्वारे पोष्टाने सादर करता येईल.

## गोशाळेबाबत माहिती

१. नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, नोदणी क्रंमाक, ई-मेल, पूर्व इतिहास, स्थापना, गोशाळेसाठी संपर्क मार्ग, जवळचे / नजिकचे शहर बाजारासाठी
२. उपलब्ध जागा - छताखाली, लागवडीखाली, कार्यालयासाठी, इमारतीखाली, पशुधनासाठी खुली जागा.
३. गोधन - गोप्रजात (वंश), एकूण, नर/मादी/वासरे, वर्गवारी असल्यास कोणत्या प्रकारात.
४. मनुष्यबळ - संख्या, पशुधनासाठी / चारा उत्पादनासाठी / गोउत्पादनांसाठी
५. उपलब्धता - कडबाकुट्टी यंत्र/दुधदोहन यंत्र/संगणकीय नोंदी/ गोबर गॅस संयंत्र/वाहने/दुग्धजन्य पदार्थ निर्मिती.
६. सरासरी दूधउत्पादन क्षमता - दैनंदिन / वेतातील - गोवंशनिहाय
७. दरवर्षी प्रसूत होणाऱ्या गायींची सरासरी संख्या.
८. अतिरीक्त गोधन खरेदी / विक्रीबाबत धोरण - नियमावली
९. चारा उत्पादन, पूरवठा, प्रकार, प्रमाण, चारापिकांचे नियोजन
१०. पशुखाद्य खरेदी, तयार करण्याची पध्दती, वापर, प्रमाण
११. पाणी सुविधा, साठवणूक, पुरवठा, यंत्रणा, वापर
१२. तंत्र पध्दती - चारा प्रक्रीया / अझोला निर्मिती / हायड्रोपोनिक्स / माज संकलन / कृत्रिम रेतन
१३. पशुवैद्यक सेवा - यंत्रणा, गरज, अडचणी, होणारे खर्च प्रमाण
१४. गोउत्पादने - शेणखत, गोबर गॅस, गोमुत्र अर्क, इतर बाबीचे उत्पादन
१५. उत्पन्नाची साधने - दूध, वासरे, गायी, वळू, गोउत्पादन विक्री
१६. गोआरोग्य नियंत्रण - लसीकरण, जंतनाशन, नमुना आरोग्य तपासणी, आजारी गोधनाबाबत धोरण.
१७. तांत्रीक माहिती संकलन- वृत्तपत्रे, मासिके, वाहिन्या माध्यम, शासन यंत्रणा, विद्यापीठ संपर्क, सेवानिवृत्त पशुवैद्यक.
१८. गोशाळा विकासाची निर्धारित / दिशा
१९. विद्यापीठ / शासन यंत्रणेकडून अपेक्षा
२०. समन्वयासाठी सहकार्याची तयारी
२१. भविष्यात उत्पादने विक्रीसाठीचा कांही आराखडा असल्यास व त्याचे नियोजन

बुक-पोष्ट

प्रति,

____________________

____________________

____________________

प्रेषक,
**प्रा.डॉ.सतिश दिग्रसकर**
सहयोगी अधिष्ठाता
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)
संपर्क : ०२४५२-२३३३७५